## -:: प्रकरण - पांच ::-

## सावकारी आणि बँक व्यवसाय

# प्रकरण - ५ वे

## सावकारी आणि वैद्य व्यवसाय

### प्रास्ताविक :

पेशवे काळात सावकारीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असे. परंतु आजच्या सारख्या त्या काळात मोठाल्या बँन्का नव्हत्या तर समाजातील वाणी, मारवाडी, गुजर हे मोठ्या प्रमाणात सावकारीचा व्यवसाय करत असत.[१] सावकारीच्या व्यवसायामध्ये शेटे, महाजन, देशा कुलकर्णी, यांचा समावेश होत असे. कर्जाचा व्यवहार तोंडी नसे. त्यासाठी ठराविक अशा पध्दती होत्या. त्यात कर्जखत, कर्जपत्र, व्याजरोखा, कर्जरोखा, आणि हरकत रोका इत्यादीचा समावेश होत असे.[२]

पेशवेकाळात खुद्द पेशवे आणि त्यांचे सरदार याना नेहमी कर्ज काढावे लागे. इ.स.१७०७ मध्ये छत्रपती शाहू महाराष्ट्रात आल्यानंतर त्यांना आपले प्रशासन सुधारण्यासाठी आर्थिक गरज भासली. त्यांना आणि पेशव्यांना नेहमी कर्जबाजारी रहावे लागले. छत्रपतीस व पेशव्यास कर्जपुरवठा करणारे अनेक सावकार पुण्यामध्ये आणि बाहेर होते. या सावकारामध्ये प्रामुख्याने नाईक, जोशी, चासकर, रास्ते, ओंकार, दिक्षीत, पटवर्धन , भिडे, परांजपे, गाडगीळ इत्यादी सावकारांचा समावेश होत असे.[३]

सावकारीच्या व्यवहारात कर्जपत्र, कर्जरोखा, गहाणखत या पध्दतीचा अवलंब केला जाई.

पेशव्याना युध्दे करावी लागली. त्यामुळे ते नेहमी मोहिमेवर असत. मोहिमेवर जाण्यासाठी पैशाची गरज भासे अशावेळी त्यांना पुण्यातील अनेक सावकाराकडुन पैसा उभा करावा लागे. युध्द जिंको किंवा हरो सैन्यावरचा खर्च टाळता येत नसे. आणि बाहेरील प्रदेशातुन खंडणी वेळेवर न आल्यामुळे त्यांना वारंवार सावकारी कर्जावर अवलंबुन रहावे लागे. या कर्जाची फेड करण्यासाठी महाराष्ट्राबाहेरील प्रदेशातील मोहीमेवरुन मोठया प्रमाणात पैसा उपलब्ध करण्याची पेशव्यांची धडपड चालू असे.[४] परंतु त्यातुनही सावकारी कर्ज फिटत नसे. म्हणून पेशव्याना कायम कर्जबाजारी रहावे लागले होते. मोहिमेवर गेलेल्या सरदारांस मोठया प्रमाणावर पैसा आणण्याबद्दल पेशव्याचे हुकुम असत. इ.स. १७५९ च्या एका उल्लेखावरुन बंगालच्या मोहिमेवर गेलेल्या दत्ताजीला मोहिमेहून मोठी रक्कम आणण्याबद्दल कळविले होते.[५]

पुण्यात रहाणारे अनेक सावकार पेशव्याना व त्यांच्या सरदारांना कर्जपुरवठा करत असत. त्यात अनगल, ओंकार, गद्रे, गाडगीळ, तांबवेकर, तुळशीबागवाले, इत्यादी सावकारांचा समावेश होत होता.[६]

पेशव्याना अडचणीच्या प्रसंगी पुण्यातील जे सावकार कर्ज देत असत त्यात प्रामुख्याने चित्पावन ब्राम्हणाचा भरणा जास्त होता. कांही गुजराती सावकार देखील पुण्यात होते. त्यामध्ये हरदास आणि दुल्लभदास यांचा समावेश होत असे.[७] सन १७७२ मध्ये पुण्यामध्ये जोगेश्वरीजवळ भिडे सावकार सराफीचा आणि सावकारीचा व्यवसाय करीत असत.[८]

पुण्यामध्ये दातार, चिपळुणकर, रास्ते इत्यादी सावकार

पेशवेकाळात होते. या सावकारानी सुध्दा पेशव्यांना कर्जे दिलेली होती. चिपळूणकर हे फार मोठे सावकार होते. त्यांनी जमखंडीकर, सांगलीकर, भोरकर, अक्कलकोटकर इत्यादी अनेक संस्थानिकांना कर्जे दिलेले होते.[९] पेशव्यांशी वैवाहीक संबंध जोडून अनेक सावकार आपला सावकारी व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्नात असत. हयामध्ये प्रामुख्याने जोशी, चासकर, रास्ते इत्यादी सावकारांचा समावेश होत असे.[१०]

पुण्यामधील इतर सावकाराप्रमाणे नागपूर शहरातील कांही सावकाराची माहिती मिळते. तिमाजी काळे, मुधोजी काळे, धारस्कर, व्यंकोजी पेरडी, झिपरे पटवर्धन इत्यादी. झिपरे पटवर्धनाने रघुजीसाठी सेनेसाहेब सुभ्याची सनद घेतेवेळी शाहूमहाराजांना १ लाख रुपये नजराणा भरला होता.[११]

बाबुजी नाईक बारामतीकर हे एक मोठे सावकार होते आणि त्यानी पेशव्यांना कर्जाऊ रक्कमा दिल्या होत्या.[१२]

पेशवाईत वाईचे वैद्य घराणेही सावकारीचा व्यवसाय करीत होते. यांचा व्यवहार पुणे, सातारा, वाई, नागपूर इत्यादी शहरामधुन होत असे, व्यवहार हा हुंडीच्या स्वरुपात चाले. इ.स.१८१५ च्या अनेक हुंडयावरुन वैद्य घराण्यातील सावकारी व्यवसायाची कल्पना येते. वैद्याचे घराणे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रसिध्द होते. नारायण बाबुराव वैद्य यानी रघुनाथ धोंडदेव झागे यांच्या नावे काढलेल्या अनेक हुंडया पेशवेकालीन कागदपत्रातुन पहावयास मिळतात.[१३] कांही सावकार

दागीने गहाण ठेवुन घेऊन सावकारी करत. त्यामध्ये प्रामुख्याने भिकारीदास सावकाराचा समावेश होता.[१४] रायाजी माने नावाचे सावकारही आपला व्यवसाय सांभाळून होते. ते कर्ज देत असत पण त्यांच्या व्याजाचा दर ५% असे. कान्होजी भोसले यानी रायाजी माने कडुन १,२०० रुपये शेकडा पंचोत्रा व्याजाने घेतले होते.[१५] शंकर अमीम शेट शाहूनगर यानी रायाजी मानेकडून ३०० रुपये पंचोत्रा व्याजाने घेतले होते.[१६]

पेशवेकाळात एक स्त्री देखील सावकारीचा व्यवसाय करीत होती असा उल्लेख सापडतो. इ.स.१७६८ मध्ये भुम येथील येशुबाई देशपांडी हिने देशमुख, देशपांडे, मुंकादम याना कर्ज दिली होती.[१७] कांहीवेळेस कांही सावकारांची कमावीसदार म्हणुन नेमणूक होई.[१८]

कांही धार्मिक लोक देखील सावकारीचा व्यवसाय करीत असत. ब्रम्हेंद्रस्वामीसारखा देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण स्वत:ला मिळालेल्या देणग्या शिल्लक टाकून पुढे तो फार मोठा सावकार बनला होता. त्यामुळे तो पेशव्याना वारंवार कर्जे देई. ब्रम्हेंद्रस्वामींनी पेशव्यांना आणि त्यांच्या अनेक सरदारांना लाखो रुपये व्याजाने दिले होते. पहिला बाजीराव पेशवा ब्रम्हेंद्र स्वामींच्या कर्जाने संकटात आला असताना त्यानी ब्रम्हेंद्र स्वामीस लिहीले होते की, " माझे विचार हे सर्वसंग सोडुन एकाद्याकडे जावे पून्हा तोंड खावदास अगर लोकास दाखवावे असे नाही, परंतु तुम्ही वडिल अगोदर श्रृत व्हावे याजकरिता लिहीले."[१९] पेशव्याबरोबर स्वामीने पेशव्याच्या अनेक सरदाराना कर्जे पुरविली होती. त्यात प्रामुख्याने आंग्रे घराण्याचा उल्लेख करता येईल. स्वामी आंग्र्याना

कर्जासाठी वारंवार तगादा लावी, आणि शापही देत असे. ब्रम्हेंद्र स्वामी दिलेल्या कर्जाला तुलशीदल असा सांकेतीक शहर वापरीत असे.[२०]

पेशवेकाळात सावकारी व्यवसायात ब्राम्हण लोकांचा जास्त भरणा होता. पेशवे हे ब्राम्हण असल्याने त्यांनी आपल्या कारकिर्दीत ब्राम्हण सावकाराना व सावकारी व्यवसायाला उत्तेजन दिले होते, असे दिसते.

सराफीचा व्यवसाय करणारे आणि कापडाचा व्यवसाय करणारे कांही लोकसुध्दा पेशवेकाळात सावकारकीचा व्यवसाय करीत असत.[२१]

पेशवे स्वारीवर असत त्यावेळी त्यांना लागणारा पैसा हा स्वारीबरोबर असलेल्या सावकाराकडुन मिळे.[२२]

## कर्ज देण्या घेण्याच्या पध्दती :

मराठेशाहीतील सावकारी व्यवसायाची बरीचशी माहिती मिळते. सावकारी हिशेब लिहीण्याची पध्दत फार चोख होती. कर्ज देतेवेळी व्यवहार लिहीण्याची पध्दत होती.

ज्यावेळी सावकार कर्ज देत असे त्यावेळी कर्ज घेणा-याकडून कांही तारण घेऊन कर्ज देत असे. ते तारण देतेवेळी कागदपत्रावर कर्ज घेणा-याचे कर्ज देणा-याचे नांव, रक्कम, व्याजाच्या दराचा आकार, व्याजाची परतफेड आणि तारण वस्तु या विषयी माहिती असे.[२३]

कर्ज देताना सावकार सहा महिने अथवा एका वर्षाच्या बोलीने कर्ज देत असत. त्यासाठी ठराविक असा हंगाम असे. पुण्यामधील सावकाराशी पेशव्याना नेहमी स्वारीवर असताना पुण्याशी संपर्क ठेवावा लागे. या कारणामुळे पुणे आणि इतर शहरात आर्थिक देवघेव मोठ्या प्रमाणावर चालत असे आणि हा व्यवहार हुंडीच्या स्वरुपात चाले. त्यामुळे पुणे हे अठराव्या शतकातील हुंडीच्या देवघेवीचे एक केंद्र बनले होते.[२४]

हुंडी व्यवहार :

पुण्यातील दिक्षीत पटवर्धनाच्या सावकारी पेढीच्या हुंडीचा व्यवहार वाराणसी, ब-हाणपूर, जालनापूर, औरंगाबाद, नाशिक,धरनेर पैठण इत्यादी पेढयांशी चाले. हुंडी ही विक्रेता खरेदी करणा-याच्या नांवावर लिहून घेत असे. यामध्ये विक्रेता ग्राहकाला त्याने खरेदी केलेल्या मालाच्या किंमतीएवढे पैसे हुंडी सादर करणा-या व्यक्तीकडे देण्याची आज्ञा करीत असे. आधुनिक Demand Draft सारखे या हुंडीचे स्वरुप होते.[२५]

तुळशी बागवाल्याच्या पेढीकडे १७६९ साली केवळ एका महिन्यात देशातील वेगवेगळया ठिकाणाहून दीड लाख रुपये किंमतीच्या हुंडया आल्या होत्या. त्यातील ५०,000 रुपयाची हुंडी सुरतेच्या नागर-लक्ष्मीदासच्या पेढीवरुन आली होती.[२६]

दिक्षीत पटवर्धनाच्या अनेक हुंडयावरुन हुंडी कोणी, कोणास, कोठे लिहीली आणि तीची मुदत व रक्कम किती याची माहिती मिळते.[२७]

पेशवेकाळात दर्शनी हुंडी, मुदती हुंडी असे हुंडीचे प्रकार होते. जी हुंडी सादर केल्यानंतर ताबडतोब हुंडी सादर करणा-यास पैसे मिळत असत तिला दर्शनी हुंडी म्हणत. हुंडी सादर केल्यानंतर कांही कालानंतर जर पैसे सादर करणा-यास द्यावयाचे असतील तर अशा हुंडीला मुदती हुंडी म्हणत.[२८]

हुंडया खाजगी व्यवहाराच्या असत आणि सरकारी व्यवहारात याना "वरात" म्हणत. इ.स.१७६६ मधील पत्रावरुन वरातद्वारे पैशाचा व्यवहार केला जाई असे दिसुन येते.[२९]

पैशाचे व्यवहार करत असताना सोने, स्थावर मालमत्ता, पागा, तलवार, कपडे इत्यादी गहाण ठेवल्याची उदाहरणे सापडतात.[३०] तर कांही लेखावरुन लोक आपले स्वत:चे असे दागिने गहाण ठेवुन पैसे घेत असत असे दिसते. इ.स.१८०२ मध्ये भिकारीदास सावकाराच्या एका दुकानात जवाहर दागीने गहाण ठेवुन एका व्यक्तीने १000 चांदवड रुपये मिळविले होते.[३१]

कर्जासाठी व्याजाचे दर :

सावकारी व्यवहारात व्याजाचा दर महत्वाचा होता. थोडया काळासाठी दिलेल्या रक्कमांना व्याज कमी असे. कर्जे देत असताना सावकार सहा महिन्यापासुन एक वर्षाच्या बोलीने कर्ज देत असत. व्याजाचा दर हा कांही ठिकाणी शंभरास महिन्यावर आकारला जाई. तर कांही ठिकाणी तो वर्षावर आकारला जात असे.[३२]

सोने गहाण ठेवून शेकडा २ रु. प्रमाणे पैसे मिळत असत.[३३] व्याजाचे दर हे भरमसाठ होते. महिन्याला शेकडा व्याजाचा दर हा तीन टक्केपर्यंत आणि वर्षाला शेकडा ३६ रुपये पर्यंत असे.[३४]

कर्ज देताना बॉन्ड दिला असेल तर शेकडा १२ % व्याज वर्षाला आकारले जाई.[३५]

कर्ज व्यवहारात सावकार व्याजाचा दर सर्वत्र सारखा आकारत नसत. कांही वेळेस १% पासुन ५% पर्यंत व्याजाचा दर आकारला जाई. इ.स.१७३३ मध्ये रायाजी माने हे एक सावकार होते. रायाजी माने हे लोकांकडून शेकडा ५ रु. प्रमाणे व्याज घेत असत.[३६] सन १७६१ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी धनशेट करंजे सावकाराकडून ३५,000 रुपये कर्जाऊ घेतले होते.[३७]

पेशव्यांना जी कर्जे सावकार पुरवीत त्याचा दर कमी असे. परंतु इतर लोकांकडून हेच सावकार ५% व्याज घेत असत. वचनचिठ्ठीचा प्रकार सावकारी व्यवहारात होता. खाजगी व्यक्तींना दिले जाणारे कर्ज हे बिगर तारणाचे नसे. त्यासाठी कांही मौल्यवान वस्तु तारण द्याव्या लागत असत. त्यावेळी सावकार कर्जदाराकडून बॉन्ड लिहून घेत असत. हया बॉन्डमध्ये प्रामुख्याने "वचन चिठ्ठी" कर्जाची परतफेड, व परतफेडीची पध्दत या गोष्टींचा समावेश असे. अशा वचन चिठ्ठयाचे अनेक प्रकार दिसून येत असत. त्यामध्ये प्रामुख्याने कर्जरोखा, वादारोखा, शरकत रोखा, इत्यादींचा समावेश होत असे. कर्जरोखा म्हणजे ऋणकोकडुन साधी वचन चिठ्ठी लिहून घेतलेली असे. वादारोखा म्हणजे वचनचिठ्ठीत

कर्जदाराकडुन कर्जाची विशिष्ठ हप्त्यात परतफेड, करण्याची बोली केलेली असे, तर शरकत रोखा म्हणजे शेतक-याकडुन त्याच्या उत्पन्नाचा अर्धा भाग देण्याची कबुली असे.[३८]

कर्ज देताना कांहीवेळा पिकाच्या हंगामावर परत करण्याची हमी घेण्यात येई. इ.स.१७२७ च्या एका पत्रावरुन प्रतापजी घोरपडे यानी केजबाण बावा याजकडुन ६ रु. शेकडा ५% ने घेतले होते ते ज्वारीच्या हंगामात परतफेडीच्या बोलीने दिले होते. जर ठरलेल्या हंगामावर ऋणकोने पैसे परत केले नाहीत तर धनको ऋणकोना त्रास देत असत.[३९]

कर्ज फेडीच्यावेळी कांही सावकार येणा-या रक्कमेत थोडी सूट देत असत. परंतु सुटीची शर्त नसल्यास सुट देत नसत.[४०]

कर्ज वसुलीच्या पध्दती या आजच्या सारख्या नव्हत्या. सावकारालाच वसुलीचा उपाय करावा लागे. हा उपाय म्हणजे ऋणकोच्या घरी जाउन "धरणे" धरणे होय. ऋणकोकडे आपला नोकर सावकार लोक पाठवुन देत असत हा नोकर कर्जदाराच्या घरासमोर २४ तास उपाशी असे त्यामुळे घरातील माणसास उपवास पडे. हया भितीने ऋणको हरएक प्रयत्नाने कांहीतरी परतफेड करत असत असे दिसुन येते.[४१]

कर्जवसुलीच्या पध्दतीत सावकाराना सरकारकडुन मदत मिळे. कर्जाची वसुली सरकारी माणसाने करुन दिल्यास त्यातील ठराविक असा भाग सरकारला द्यावा लागे. इ.स.१७७२ मध्ये नगरचे एक सावकार विठ्ठल लक्ष्मण नाईक यांचे लोकाकडील कर्ज पेशव्यानी पारनेरच्या कमावीस-

दाराला वसुल करावयास सांगितले होते.[४२]

कांही वेळेस ऋणकोना चीड आणणारी पत्रे सावकार देत असत. ब्रम्हेंद्रस्वामी पेशव्यांचे व अनेक सरदारांचे गुरु आणि सावकार होते. त्यांनी पेशव्यांना व सरदाराना पैशाविषयी चीड आणणारी पत्रे लिहीलेली दिसून येतात. यामध्ये शिव्या आणि शापांचा भरणा असे. इ.स.१७४२ मध्ये ब्रम्हेंद्रस्वामींनी आंग्रेकडील कर्ज वेळेवर न आल्यामुळे अनेक "शाप" व शिव्यांचा भडिमार केलेला दिसुन येतो. " तुमचा कुलक्षय होई देवाचा रुका ठेवल्यास वेल वाढणार नाही". अशी शापमय पत्रे ब्रम्हेंद्रस्वामी आंग्र्याना पाठवीत असत.[४३] आंग्रेना स्वामी सतत आपल्या कर्जाविषयी स्मरण देई. " लटके बोलुन द्रव्य मिळविले नाही देवाचे द्रव्य ठेवल्यास उत्तम नाही या जन्मी दिले म्हणजे उत्तम न दिले तर पुढे परजन्मी एक रुपयास सहस्त्ररुके सहकुटुंबानिशी तुम्हास द्यावे लागेल."[४४]

वरील सर्व माहितीवरुन पेशवेकाळातील सावकार दिलेल्या कर्जाची वसुली ही कशाप्रकारे करत असत याविषयी माहिती मिळते.

रामचंद्र अमात्यानी सावकारी पेशा विषयी गौरवाचे उद्गार काढलेले आहेत. त्यांच्या मते " साहूकार म्हणजे राज्याची शोभा, साहूकारांच्या योगाने राज्य अबादान होते. न मिळे त्या वस्तू राज्यात येतात. ते राज्य श्रीमंत होते. त्यामुळे साहूकाराचे संरक्षण करणे फायद्याचे आहे."[४५]

## वैद्य व्यवसाय

पेशवेकालात महाराष्ट्रात सावकारी व्यवसायाप्रमाणे वैद्यांचा व्यवसायही मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होता. अनेक वैद्य आपला वैद्यकिय व्यवसाय करीत असत.

पेशवेकालीन वैद्य व्यवसायामध्ये कांही वैद्य गोरगरीबांना मोफत औषधोपचार करीत असत. तेंव्हा त्यांना कांही उत्पन्न म्हणुन मोकासा दिला जात असे.[४६]

आजारातुन बरे होण्यासाठी जसा औषधांचा वापर केला जाई. तसा दान केल्याने आजार बरे होतात अशी समजून पेशवेकाळात होती. त्या कारणाने क्लेश परिहारार्थ, आरोग्यप्रित्यर्थ दाने करण्याची वहिवाट होती. इ.स.१७७१ मध्ये तुळशीबाग कराची एक स्त्री जानकीबाई हिच्या आजारपणात नाना प्रकारची दाने करण्यात आली होती. अनुष्ठाणे केली, जप केले देवास प्रदक्षिणा घालविण्यात आल्या, होमहवन झाले, परंतु हे सर्व उपाय निष्फळ ठरुन अखेरीस त्या बाईचा मृत्यु झाला. या दानामध्ये एक म्हैस देखील होती.[४७]

साता-याजवळ वडुज येथे लक्ष्मणराव वैद्य आणि शिवराव वैद्य वैद्यकिय व्यवसाय करीत होते. दयाराम काशीकर हे नाशिक येथे रहात होते. त्यांनी आपला वैद्यकीय व्यवसाय पेशवाईत उत्तमरितीने चालविला होता.[४८]

नानासाहेबांची पत्नी गोपिकाबाई पुण्यात प्रसुत झाली. त्यातच तिला ज्वर येऊ लागला. तिला या आजारात उपचार करण्यासाठी साता-याहून दत्ताजी पंत वैद्याना पाचारण करण्यात आले होते. हा वैद्य साता-यास शाहू महाराजाजवळ होता.[४९]

वैद्यानी धर्मार्थ गोरगरीबाना मोफत औषधोपचार करावा म्हणून इनामे बहाल केली हजात असत. परंतु कांही वैद्याना रोख पगार दिला जाई. सन १७७३ मध्ये रेवदंड्याहून आलेल्या एका इंग्लीश डॉक्टरास दरमहा १५० रु. पगार दिला होता.[५०] सन १७७२ मध्ये राजेश्वर वैद्यास दरमहा १५० रुपये वेतन होते. कांही वैद्याना अर्धा महिन्याचा पगार हा ९ रुपयापासुन ११ रुपयापर्यंत होता. अनेक वैद्याना पेशवेकाळात रोख पगार दिला जात असे. भिकोबा वैद्यांचा वार्षीक पगार हा १,००० रुपये होता.[५१]

वैद्याच्या औषधालयात कमी खर्चाची औषधे म्हणजे चूर्ण आणि भस्म यापासून तयार केलेली असत. परंतु मौल्यवान औषधाकरीता प्रवाळ, सुवर्ण मौतीक, यासारखी भारी किंमतीची द्रव्ये लागत.[५२]

दर लावुन औषधे विकण्याची प्रथा नव्हती. औषधाचा गुण आल्यानंतर मोबदला म्हणुन वैद्यांना थोडी बहुत रक्कम देत असत.[५३]

वैद्य लोक आपल्या वैद्यकिय व्यवसायात अनेक वनस्पतींचा औषधी म्हणुन वापर करीत असत. हरभ-याच्या झाडावरील " आंब " याचा उपयोग औषधात केला जात असे.[५४]

सन १७६७ मध्ये माधवराव हैदरवरील स्वारीवर असताना ते आजारी होते. त्यावेळी त्याना आवळ्याचा मुरंबा हे औषध देण्यात आले होते. त्याचप्रमाणे गोमुत्र्या, शिलजीत हिरडे इत्यादी वनस्पतीचा उपयोग औषधात केला जात असे. कवठे, मुरंबा, रामटेकची पाने, पाण्यातील कमळे यांचाही वापर औषधे तयार करण्यासाठी केला जात असे.[५५]

बाळंतशोफा, शहाजिरे, अग्नीसुत, व गंधकाचा अर्क यांचा वापर औषधात केला जात असे.[५६]

दातदुखीसाठी तयार केलेले औषध पेशवेकालात वैद्यांच्या जवळ मिळत होते. परंतु कांही औषधाने दात कळे पडत असत. म्हणुन इ.स. १७६६ मध्ये मोरोबा वैद्यानी एक खास दाताचे औषध तयार केले होते अशी माहिती मिळते.[५७]

वैद्यकिय व्यवसायात औषधांचा विचार करता काळानुसार बदल होत गेला. प्राचीन काळातील रोग, मध्ययुगातील रोग , व सध्याचे आजार यामध्ये फारसा बदल दिसुन येत नाही. आधुनिक काळात अनेक रोगावर औषधोपचार निघाल्यामुळे देवीसारखे महामरीसारखे रोग आपल्याला पहावयास मिळत नाहीत. परंतु पेशवेकाळात थंडी, ताप, गोवर, कांजण्या, पोटशूळ, नारु, कावीळ यासारखे आजार मोठया प्रमाणावर होत असत. देवीसारखी साथ पसरली तर हजारो लोक मृत्युमुखी पडत असत.[५८] परंतु तत्कालीन वैद्यानी या आजारावर औषधे शोधुन काढल्यामुळे त्या रोगावर कांही प्रमाणात औषधोपचार होत असत.

१७ व्या शतकापासुन पाश्चात्याच्या निकट संपर्कापुढे भारतीय राज्यकर्ते परकिय वैद्य व त्यांची औषधे यांचा उपयोग करु लागले होते. भारतामध्ये अनेक परकिय वेगवेगळ्या कारणासाठी आले होते. त्यामध्ये कांही वैद्याचाही समावेश होता. परंतु ते तेथील स्थानिक लोक नव्हते. मराठा कालखंडात आजच्यासारखी वैद्यकिय व्यवसायात सुधारणा झाली नव्हती. पेशव्यांनी आपल्या राज्यकारभारात वैद्यखाना निर्माण केला होता. त्यात अनेक वैद्य व हकिम होते.[५९]

शिवकालापासुन पाश्चात्यांच्या भारतातील आगमनामुळे महाराष्ट्रातील लोकांनी पाश्चात्य डॉक्टरांचा आणि हकिमाचा पुरेपुर फायदा घेतला होता. पेशवे सरकार आणि त्यांचे सरदारसुध्दा परकिय वैद्याकडुन औषधोपचार करुन घेत असत. पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या वेळी डॉ.सॅन्डो या इंग्रज वैद्यांचा मराठा दरबारात प्रवेश झाला होता.[६०]

वैद्य लोक राजधानीतून असत. जे आपल्या व्यवसायात वाक्बगार असत अशा वैद्यांना राजदरबारात राजाश्रय मिळे. हे वैद्य राजाचे कौटुंबिक वैद्य असत. मौल्यवान औषधाकरिता सुवर्ण, मौक्तीक, आणि प्रवाळ, यांचा उपयोग केला जात असे. ही द्रव्ये राजे लोकांकडून वैद्याना मिळत असत आणि तयार झालेली औषधे सर्व जनतेसाठी वापरली जात असत.[६१] पेशव्यांप्रमाणे त्यांचे सरदारही आपल्या पदरी वैद्याना ठेवून घेत असत. महादजी शिंदे यांच्याजवळ शुकदेव मिश्र नावाच एक वैद्य होता. तो झाशीचा होता. त्याने महादजीच्या पत्नीला जिवावरच्या दुखण्यातून वाचविल्यामुळे महादजीने खुष होऊन त्याला ९०० रुपये उत्पन्नाचे एक गाव इनाम दिले होते.[६२] ग.ह.ख-यांच्या मतानुसार महादजी शिंद्यांना शुकदेव

हा मथुरेत भेटला होता व चरितार्थासाठी कांहीतरी द्यावे असे म्हटल्याने त्याला १० मे,१७८० रोजी मौजे बिरुणा, परगणे फरा येथे नव्वद एकर जमीन दिली होती.[६३]

इ.स.१७६४ मध्ये पेशव्यांच्या वैद्यखानाच्या प्रमुख विसाजीराम होता. या वैद्यखान्यात अनेक हकीम आणि वैद्य होते. त्यांना चांगला पगार दिला जाई. भिकोबा वैद्य यास इ.स.१७७२ मध्ये वर्षाचा पगार १,000 रुपये देण्यात आला होता. कांही शास्त्री वैद्याना आठवड्याचा पगार हा ७ ते ८ रुपये मिळे.[६४]

शस्त्रक्रियेत भारतीय डॉक्टरापेक्षा युरोपियन डॉक्टरास चांगले ज्ञान होते आणि त्यांनीसुध्दा पेशवेकाळात राजेराजवाडे यांच्या दरबारात प्रवेश केला होता. पुष्कळ मराठे सरदारही या वैद्यांकरवी औषधे घेत असत.[६५] तसेच क्रुसो आणि फीडले हे युरोपियन वैद्य सवाई माधवरावाच्या कारकिर्दीत प्रसिध्दीस आले होते. हे पाद्री मिशनरी असल्यामुळे त्यांनी पुण्यामध्ये कोणाला मोफत तर कोणास माफक पैशात औषधोपचार केला होता व शस्त्रक्रियाही केल्या होत्या.[६६]

सवाई माधवराव पेशवे शनिवार वाड्याच्या गच्चीवरुन खाली पडले त्यावेळी देखील इंग्रज वैद्यानी त्यांच्यावर उपचार करण्याची परवानगी मागितली होती. परंतु ती त्याना मिळाली नाही. कारण पुण्यातील कांही ब्राम्हण मंडळी या परकिय वैद्यांकडून औषधोपचार करुन घेण्यास काकु करीत असत.[६७]

पेशव्यांच्या पदरी त्यांचे वैद्य असताना कांही वेळेला औषधोपचारासाठी महाराष्ट्राबाहेरुन वैद्याना पाचारण केले जाई. इ.स.१७३९ मध्ये नानासाहेबाची आई काशीबाई आजारी असताना उपचार करण्यासाठी नबाबाच्या दरबारातील भरमाण्णा वैद्याला पाचारण करण्याचे प्रयत्न झाले. पहिले माधवराव पेशवे नेहमी आजारी असत त्याना आजारातुन बरे करण्यासाठी निजामाजवळ असलेल्या डॉक्टरांचा त्यांना उपयोग करुन द्यावयाचा होता. एखादा चांगला वैद्य असेल तर त्याना चांगला पगार देण्यास पेशवे तयार होत असत.[६९] तसेच कांही चांगल्या वैद्याना त्यांच्या कामाबद्दल कांही गावे इनाम मिळत असत.[७०]

पेशवाईच्या उत्तरार्धात १८०६-११ च्या दरम्यान पुण्यामध्ये देवीची साथ फैलावली होती. त्यावेळी इंग्रज डॉक्टरानी १२,००० लोकांना देवीची लस टोचुन या साथीतुन वाचविले होते.[७१]

पेशवे आपल्या दरबारी अनेक वैद्याना राजाश्रय देत असत. परंतु कांही वेळेस त्यांच्या औषधाने गुण आला नाही तर इतर वैद्यांची मदत द्यावी लागत असे. सातारा-यास शाहू महाराज आजारी असताना त्यांना सदाशिव नाना भटानी आजारातून बरे केल्यामुळे नसरापूर येथे एक चाहूर जमीन इनाम दिली होती.[७२]

राघोबा दादा माधवरावाशी भांडण झाल्यानंतर नाशिक जवळील आनंदीवल्लीस रहात होता. हयावेळी त्याच्याजवळ हकीम वैद्य होते. तरीही राघोबा दादा पुण्याहून औषधे मागवीत असे. पुण्यातील मोरोबा वैद्याकडुन त्यानी दातावरील औषधे मागवीले होते.[७३] मोरोबा

व रोजेश्वर भट यांनी माधवराव जेजुरी येथे आजारी असताना त्यांच्या-
वर औषधोपचार केला होता.[७४]

अशाप्रकारे अठराव्या शतकात महाराष्ट्रात सावकारीचा व वैद्य व्यवसाय यांना महत्व होते.हे निदर्शनास येते. आर्थिक जीवनात सावकारांना अनन्यसाधारण महत्व होते. व्यापाऱ्यांना,सर्वसामान्यांना व पेशव्यानादेखील सावकार वेळोवेळी आर्थिक मदत करीत असत. आर्थिक उलाढालीमध्ये त्यांचा वाटा मोठा होता. तर वैद्य लोक लोकांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्रयत्न करीत असत. आजच्या एवढे वैद्यकशास्त्र त्यावेळी जरी प्रगत झालेले नसले तरी वैद्य वेगवेगळ्या रोगावर औषधोपचार करीत असत. कांही रोगावर त्यांच्या औषधांचा चांगला परिणाम होऊन रोग बरे होत असत.हे निदर्शनास येते.

-x-x-x-x-x-

सं द र्भ :

१. Crawford, History of Poona and Deccan in a Perspective P.192.

२. Chitnis K.N. , Socio Economic Aspect of Medieval India P.442.

३. Gokhale B.G., Poona in the 18th Century an Urban History P.132.

४· सरदेसाई, काले, वाकसकर, काव्येतिहास संग्रह, पृ·१५४

५· कित्ता·

६· Chitnis K.N., OP. Cit., P.435.

७· Gokhale B.G., OP. Cit., P.P. 130, 131.

८· सावकार भिडे, पुणेनगर, संशोधन वृत्त सं·खं·४, भा·इ·सं·मं·
व·३२, अंक १-४·

९· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·२७६·

१०· Gokhale B.G., OP. Cit., P.132.

११· लांडगे, देविदास, गोवदि गोविंद, संशोधनाजली, विदर्भ,
संशोधन मंडळ ग्रंथमाला· क्र·१५, पृ·४५·

१२· Gokhale B.G., OP. Cit., P.137.

१३· काळे वा·गो·, आणखीन कांही हुंड्या, भा·इ·सं·मं·,त्रै·व·१७
अंक १, पृ·११८·

१४· कर्वे ची·ग·, भिकरदास सावकार, पुणेनगर, संशोधन वृत्त खं·३,
पृ·२२७·

१५· पवार ए·जी·, ताराबाई कालीन कागदपत्रे, खं·१, पृ·११८·

१६· कित्ता· ८८

१७· वाड ग·चि·, पे·रो·, खं·७, पृ·१६९·

१८· Gokhale B.G., OP Cit., P.132-33.

१९· पारसणिस, ब्रम्हेंद्रस्वामी लेखसंग्रह, ले·३१·

२०· राजवाडे वि·का·, म·इ·सा· खं·३, ले·१७९·

२१· जोशी श·ना· , मराठेकालीन समाजदर्शन, पृ·१६३·

२२· कित्ता, पृ·१६४·

२३· Chitnis K.N., Socio Economic Aspect of Medieval India, P.435.

२४· सरदेसाई, पे·द·, खं·३९, पृ·१६४·

२५· Chitnis K.N., OP.Cit., P.P. 435, 436.

२६· कित्ता, पृ·१२२·

२७· काळे वा·गो·, आणखीन कांही जुन्या हुंडया, भा·इ·सं·मं·, त्रै·व· १७, अं·१, पृ·११८·

२८· Chitnis K.N., OP. Cit., P.436.

२९· सरदेसाई गो·स·, पे·द·, खं·३९, पृ·५९·

३०· ठंबु दा·गो·, आंग्रे घराण्याचा इतिहास, पृ·३२८·

३१· पुणेनगर संशोधन वृत्त ३, पृ·२२७·

३२· Chitnis K.N., OP. Cit., P.440, 41.

३३· पुणेनगर संशोधन वृत्त, खं·३, पृ·२२७·

३४· Chitnis K.N., OP. Cit., P.P.440, 41.

३५· सरदेसाई, पे·द·, खं·३९, पृ·३·

३६· पवार,ए·जी· , ता·का·का· खं·२, पृ·१५८·

३७· सरदेसाई, पे·द·, खं·४०, पृ·१३७·

३८· Kulkarni G.T., Banking in the 18th Century. A Case Study of Poona Banker, Artha Vijnana, Vol.XV N.Z.

३९. राजवाडे वि.का., म.इ.सा. खं.१५, पृ.११३.

४०.सरदेसाई, वाकसकर, ऐतिहासिक पत्रे व लेख, ले.१८६.

४१. चापेकर, पेशवाईच्या सावलीत, पृ.१३०.

४२. वाड ग.चि., पे.रो., खं.७, ले.५६२.

४३. ढबु दा.गो., आंग्रे घराण्याचा इतिहास, पृ.१६९.

४४. पारसणीस, ब्रम्हेंद्रस्वामी लेखसंग्रह, ले.३१२,३१६,३१७,३२२.

४५. आज्ञापत्र पृ.२४,२५.

४६. वाड ग.चि., पे.रो., खं.८, पृ.२२२.

४७. चापेकर ना.गो., पेशवाईच्या सावलीत, पृ.५०.

४८. खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग १२, पृ.६७२.

४९. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.९७.

५०. सरदेसाई गो.स., पे.द., खं.२२, पृ.१३१.

५१. कित्ता, पृ.११८, १२४, १२६.

५२. Gokhale B.G., OP. Cit., P.84.

५३. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.९६.

५४. सरदेसाई, पे.द., खं.८, पृ.४०.

५५. कित्ता, खं.३२, पृ.७७.
पवार ए.जी., जिजाबाई कालीन कागदपत्रे,पृ.२०९.
Shejwalkar, Nagpur Affairs II, P.8.

५६. सरदेसाई, पे.द., खं.३२, पृ.८५.

५७· Gokhale B.G., OP.Cit., P.84.

५८· Ibid, P.84-85.

५९· Gokhale B.G., Poona in the 18th Century An Urban History, P.84.

६०· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१००·

६१· कित्ता, पृ·९६·

६२· पारसणीस, इतिहास संग्रह, क्र·३५, पृ·५८·

६३· डॉ·प्र·ल·सासवडकर, अठराव्या शतकातील वैद्य, भा·इ·आणि संस्कृति, पु·२६, वर्ष १९७०, पृ·५९·

६४· Gokhale B.G., Poona in the 18th Century An Urban History, Page 84.

६५· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·१०२·

६६· कित्ता, पृ·१०२·

६७· पारसणीस डी·बी·, सरचार्लस मालेट आणि इंग्रजी वैद्यक्रिया· (सवाई माधवराव पेशव्यांच्या दरबार) , पृ·५८-६०·

६८· सरदेसाई, पे·द·, खं·४०, पृ·१७·

६९· कित्ता, खं·३२, पृ·८६,८७·

७०· वाड ग·चि·, पे·रो·, खं·२, पृ·१३७·

७१· G Gokhale B.G., OP. Cit., P.85.

७२· भावे वा·कृ·, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ·९७·

७३· सरदेसाई, पे·द·, खं·३२, ले·९२·

७४· सहस्त्रबुध्दे एस्·ए·, श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, पृ·१२८·

=0=0=0=0=0=